# केशव सखाराम देशमुख यांच्या कवितेतून चित्रित झालेले शेतकरी जीवन

**डॉ. महेश बापुरावजी जोगी**
मराठी विभागप्रमुख
सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी
मोबाइल नंबर -9834826713
ई-मेल-mjogi923@gmail.com

---

***सारांश (एबस्ट्रॅक) :***

*कवी केशव सखाराम देशमुख यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून शेतकरी जीवन अधोरेखित करण्याचा प्रयत्त केलेला आहे. त्यांनी आपली नाळ शेती जीवनाशी सतत जोडून ठेवलेली असून त्यांनी आपल्या कवितेतून शेतकरी, गाव, शेतकऱ्यांच्या व्यथा, शेतकऱ्यांच जगण, शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, जागतिकीकरणात होरपडत असणारा शेतकरी, शेतकऱ्याप्रती असणारी शासनाची दुरावस्था, गावातील तरुण पिढी, निसर्ग, शेतकऱ्यांची होणारी कुचंबना इत्यादी विषयांना हाताळून वर्तमान काळातील शेतकरी हा कशा पद्धतीने हतबल होत चालला आहे. त्याचे अतिशय जिवंत व वास्तववादी दर्शन कवी केशव सखाराम देशमुख यांनी त्यांच्या संपूर्ण कवितासंग्रहातून अतिशय दमदारपणे मांडलेले आहे.*

**की वर्ड्स :**

शेतकरी,कष्टकरी, श्रमकरी बापाचे जीवन, कालवाकालव , गाव, हंगाम, सांस्कृतिक संदर्भ, श्रम, शेण, भोवताल, बैलाची पात, परोपकार, बारा भानगडी इत्यादी**.**

---

**ग्रामीण जीवनातील शेतकऱ्याचे शोकात्म दर्शन :**

मानवी जीवनाशी कवितेचा संबंध असल्यामुळे ती मानवी स्वभावाच्या चांगल्या आणि वाईट स्वभावाची उत्स्फूर्त अशी अभिव्यक्ती करीत असते. ती मानवी जीवनाशी संबंधित असल्यामुळे ह्या कवितेतून समकालीन जीवन अभिव्यक्त होत असते. अशाच प्रकारचे ग्रामीण जीवन कवी केशव सखाराम देशमुख यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. त्यांनी एकूण सहा कवितासंग्रह लिहिले असून या सहाही कवितासंग्रहातून प्रामुख्याने आपल्या कवितेत शेतकरी जीवन हे केंद्रस्थानी ठेवून काव्य निर्मिती केली आहे. त्यांच्या कवितेमध्ये सुरुवातीच्या काळातील शेतकरी जीवन हे अतिशय समृद्ध असे ' पाढा ' या कवितासंग्रहात दाखवलेले आहे.' पाढा ' या कवितासंग्रहातून त्यांनी शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी बापाचे जीवन हे शेतीशी निगडित कसे आहे हे प्रातिनिधिक स्वरूपात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कारण प्रत्येकच शेतकरी असणारा बाप आपल्या शेतीमध्ये कशाप्रकारे राबवत असतो हे सांगताना ते म्हणतात,

**" माती कपाळास लावून रोज त्याचा श्वास चालतो,**
**जनावरांच्या शेणामुताचा वास त्याच्यासाठी दैनंदिनीचा प्राणवायू**
**त्याची उजाडलेली प्रत्येक सकाळ श्रमाचा जप उंच करीत नेणारी**
**घरीदारी मुक्कामास आलेली सायंकाळ त्याच्याकरिता कष्टाचं सूत्र लिहून ठेवणारी "1**

ग्रामीण संस्कृतीमध्ये जीवन जगणारा हा बाप प्रामुख्याने काळ्या आईला सर्वात आधी प्रणाम करून त्याच्या दिवसाची सुरुवात होत असते. तो सर्वात आधी जनावराच्या शेणामुताचा वास घेत असून त्यातूनच त्याला प्राणवायू मिळत असतो असे कवीला वाटते. त्याला शेतीसाठी कितीही प्रकारचे श्रम करावे लागले तरी तो कधीही हूं की चू करत नाही किंवा कुठलीही तक्रार करत नाही. कारण त्याने आपल्या कपाळी कष्टाचं सूत्र स्वीकारल असल्यामुळे हे श्रम त्याला जगण्याची नवनवी उमेद प्रत्येक दिवसांगनिक देत असते असे कवीला वाटते. ह्या शेतीमधून निघणार प्रत्येक वर्षाचं पीक हे त्याला आनंद देत असते. त्यामुळे या शेतकऱ्याच्या वाट्याला किती श्रम आले तरी तो डगमगत नाही तर आनंदाने हे सर्व स्वीकारत असतो. ह्या ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीविषयक काही नियम, प्रथा,परंपरा सुद्धा तयार करून ठेवलेल्या आपल्याला पाहायला मिळतात.त्या नियमाप्रमाणे ते शेतकरी आपले जीवन जगताना या ठिकाणी दिसतात. असेच शेतकऱ्याचे नियम सांगताना कवी म्हणतो,

**" खळ सुरू असताना**
**कंणस बैलांच्या खुराखाली खुंदडली जातात.**
**दाणा दाणा**
**कंणसांतून भुशीसह खळेभर होतो**
**अशावेळी बोडक्या डोस्क्यांन**
**खळ्यात जाऊ नये**
**आणि**
**मेडीभोवती फिरतांना**
**बैल हागले तर तळहातांवर झेलून घ्यावं शेण "2**

शेतकऱ्यांना खळं म्हणजे पिकलेलं धान्य काढण्यासाठी तयार केलेला एक चोखंबा असतो. या खळ्याला तयार करताना मधोमध एक खुंटी गाडली जाते. त्या खुंटीच्या भोवताल शेण पाणी टाकून चांगले त्याला बैलांच्या पायानी मजबूत केले जाते. परत त्याला शेणाने सारवुन मग त्या खड्यात धान्य टाकले जाते. ते धान्य म्हणजे ज्वारी असो,बाजरी असो,गहू असो,हरभरा असो,तूर असो, जवस असो, करडी असो किंवा इतर कुठलीही पिके असो, त्या पिकांना धान्याचे स्वरूप येण्यासाठी 'बैलाची पात ' म्हणजे त्यांच्या खुराखाली खुदडली जाते. आणि ही पात सुरू असताना कोणत्याही व्यक्तीने बोडक्या डोक्याने त्या खळ्याजवळ जाऊ नये तर आपल्या डोक्याला फेटा बांधूनच जावे म्हणजे धान्याच्या स्वरूपात असणारी लक्ष्मी नाराज होणार नाही. याची दक्षता घेतली पाहिजे हा संकेत प्रत्येकच शेतकरी पुढे येणाऱ्या सर्व पिढीला देत असतो. कारण शेवटी शेतकऱ्याची खरी लक्ष्मी ही धान्यच असते. ते धान्य जर चांगले पिकले तर त्यांच्या जीवनात आनंद बहरत असतो आणि ते धान्य जर पिकले नाही तर त्याच्या वाट्याला दुःख येत असते म्हणून हे दुःख वाटायला येऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी प्रथा,परंपरा, नियम तयार केलेले दिसतात. बैलांचा शेणमूत म्हणजे एक प्रकारची लक्ष्मीच असते अशी भावना शेतकऱ्यांची असलेली दिसते. कारण शेतात जर शेणखत चांगल्या प्रकारे टाकले तर त्या शेतीतून धनधान्य जोमाने येत असते म्हणून ह्या सर्व नियमांना शेतकरी आधीच्या काळात अतिशय चाणाक्षपणे जपत असलेले दिसते. शेतकऱ्यांच्या घरात येणार पहिल पीक म्हणजे त्याच्यासाठी ती लक्ष्मीच असते. मग ते पीक ज्वारी असो अथवा मूंग असो अथवा इतर प्रकारचे कुठलेही धान्य असो,हे पीक प्रामुख्याने सप्टेंबर - ऑक्टोबर महिन्यामध्ये येत असल्यामुळे त्या पिकासोबतच शेतकऱ्यांच्या घरी महालक्ष्मीचे सुद्धा आगमन होत असते. त्या महालक्ष्मीची आव भगत शेतकरी अतिशय तन्मयतेने करीत



Research Hub International Journal

असतो. म्हणून त्या महालक्ष्म्या प्रसन्न होऊन त्या शेतकऱ्यांना धनधान्याचे कोठार भरून देऊन एकप्रकारची समृद्धी बहाल करीत असते. ही गावातील समृद्धी आधी जनावरांनी, पशुपक्ष्यांनी भरगच्चपणे भरलेली होती असे कवी या ठिकाणी सांगतो. गावातील माणसे एकमेकांसोबत गुण्यागोविंदाने नांदत होती. त्यांच्या जीवनातील श्रद्धा ह्या नेहमी निर्माणाला चालणा देणाऱ्या होत्या. परोपकार हा प्रकार गावामध्ये आधी प्रचंड मोठ्या प्रमाणात पाहायला मिळायचा. त्यातून सहकार या क्षेत्राची निर्मिती झाली असे कवीला वाटते. आज महाराष्ट्रामध्ये जे सहकार क्षेत्राचे जाळे पसरले आहे.त्याला खऱ्या अर्थाने गावाच कारणीभूत असलेले कवीला वाटते.

पण अशी समृद्ध असणारी गावसंस्कृती ही जस जशी काळ पुढे जात आहे तस तशी बदलत चालली आहे ही जाणीवही कवीनी आपल्या पुढल्या कविता संग्रहातून व्यक्त केली आहे. ते 'भोवताल ' ह्या आपल्या कवितेत म्हणतात,

**" ढोरांचे गोठे ओस झाले**
**भावाभावांत जुपल्यात हाणामाऱ्या**
**सुना, सवती धरीत आहेत एकमेकींच्या झिपोट्या"3**

आधुनिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या घरातील परिस्थिती ही बदलत चालली आहे.आधीच्या काळात संयुक्त कुटुंब पद्धती होती.ज्या कुटुंबपद्धतीमध्ये चार -चार भाऊ एकमेकांच्या बायका मुलासह गुण्यागोविंदाने राहत असत पण आजच्या काळात मात्र आधुनिकीकरणामुळे भावा -भावात झगडे -भांडणे जुंपत असून ह्या भांडणाचे स्वरूप हाणामाऱ्यात होत आहे.हे कवी या ठिकाणी सांगताना दिसतो. त्यामुळे एकेकाळात ग्रामीण जीवनात सुखाने नांदणारी लक्ष्मी मात्र आता त्या गावाच्या वेशी बाहेर गेली आहे. त्यामुळे गावात गंजिफा, दारू, भानगडी याने घर केलेले आहे. शेतकऱ्यांच्या मुलांचे हात हे खऱ्या अर्थाने श्रमात राबवायला पाहिजे होते ते हात गंजिफा,दारू, बारा भानगडी यात गुरफटले असल्यामुळे त्यांचे रान किंवा शेती खऱ्या अर्थाने बहरून येत नाही ही सल ही कवी बोलून दाखवताना दिसतो. एकेकाळी हीच गावाची शिव धनधान्यांनी बहरून येत असत आणि शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करीत असत. पण आज मात्र ही शिव आपली कुसं बदलत आहे. आणि गाव संस्कृती लोप पावत चालली आहे. लोकांना समाधान देणारे, संस्कार देणारे वातावरण आता गावातून उध्वस्त होत चालले आहे. त्यामुळे गावात आता जीव रमत नाही ही भावनाही कवी बोलून दाखवतो. ह्या ग्रामीण संस्कृती विषयी मोहन पाटील म्हणतात, " हाडीमाशी खिळलेली संस्कारशीलता, संवेदना सहजासहजी शिकून येत नाही. ती परंपरेतून, मातीतून,हातातल्या कामातून आणि डोक्यात गच्च बसलेल्या जीवनविषयक धारणेतून येत असते आणि जन्मत: असते ही अतिशयोक्ती नाही. ग्रामसंस्कृती, ग्रामीण संस्कार हा वेगळा भाग आहे."4

ह्या ग्रामसंस्कृतीने दिलेला जीवनधर्म आत्ताच्या काळातील शेतकरी विसरत चालल्यामुळे त्याच्या जीवनात दुःखाने जागा घेतली आहे. हे शेतकऱ्याचे दुःख संपण्याचे नाव घेताना दिसत नाही तर त्याच्या वाट्याला सतत उपेक्षाच येतांना दिसते आहे ही उपेक्षा कशाप्रकारची आहे हे सांगताना कवी म्हणतो,

**" जन्मभर रान काढले सोलून,**
**हाती मात्र शून्याचे घमेले!**
**मनगटात सतत उत्पादनाच्या बेरजा जन्माला घातल्या पण**
**हिशेब मात्र वांझ ठरत गेले**
**उतरंडीची मडकी घरंगळावीत तशी**

**घरंगळत गेली सारी सारी हिरवी स्वप्ने "5**

शेतकरी वर्षभर आपल्या शेतामध्ये राबराब राबतो. त्यातून तो आपले सारे रान सोलून काढत असतो. तरी पण त्याच्या हातात मात्र शून्यच येत असते. त्यांनी किती उत्पादनाच्या किंवा पिकाच्या बाबतीत बेरजा करण्याचा प्रयत्न केला तरी व्यापारी मात्र त्याला बेरजेचा हिशेब हाताला लागू देत नाही. तर त्याच्या वाट्याला दारिद्र्यच बहाल करीत असते. म्हणूनच त्याच्या मनात ह्या सर्व परिस्थिती विषयी कालवाकालव सुरू असते आणि ज्याप्रमाणे एखाद्या उतरंडीवरून मटके घरंगळत जावे तसे शेतकऱ्यांचे आयुष्य सततच घरंगळत असते. त्या घरंगळण्याला कुठेही आधार मिळताना दिसत नाही. त्याच्या वाट्याला सतत कोरडेपणात येत असतो असे कवीला वाटते. शेतकऱ्यांच्या डोक्यावर दिवसेंदिवस कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. त्याच्या या कर्जाचा विचार शासन, समाज किंवा लोकप्रतिनिधी करताना दिसत नाही. शेतकऱ्याने पिकविलेल्या मालाला जो योग्य भाव मिळाला पाहिजे तो भाव व्यापारी वर्ग त्यांना देताना दिसत नाही. भांडवलदार वर्ग हा ढोंगी आणि स्वार्थ हेतू मनात बाळगुण सतत शेतकऱ्यांना लुबाडण्यात धन्यता मानत असतो.त्यामुळे त्याच्या आयुष्यात अथक परिश्रम करूनही बेरजेचे गणित कधीच येतांना दिसत नाही. येथील बाजारू संस्कृतीने त्याला सतत गांजविण्याचेच काम केलेले आहे.हे सांगताना कवी म्हणतो,

**" आहे भिजत बाजारात त्वचा**
**बाजार शिळाच भाकरीगत**
**बाजाराला झालीय सर्दी**
**खोकला हिंडतोय मोकळा बाजारात**
**बाजारात मिरच्याचा वावर मोठा**
**आणि भुरकी चटणी बाजाराच्या डोळ्यात**
**त्वचा बाजारात भिजत आहे."6**

ह्या बाजारू संस्कृतीने शेतकऱ्याची त्वचा सोलून खाण्याचाच घाट घातला आहे.त्याला येणकेन प्रकारे कसे सोलून -भाजून काढता येईल याचेच त्यांचे मनसुबे आहे.त्यामुळे शेतकरी हा सर्वत्र होरपळून निघत आहे. यासंदर्भात वामन जाधव म्हणतात,"वारंवार येणारे दुष्काळ,पाण्याच्या नियोजनाचा अभाव,भांडवलाची कमतरता,आधुनिक शेती ज्ञानाची वानवा, लोकसंख्या, शेती मालाच्या भावाची अनिश्चितता, मजुरांची वाढती मजुरी,सावकारशाही,नोकरशाही यांच्याकडून त्याची होणारी अडवणूक, समाजव्यवस्थेकडून होणारे शोषण, यामुळे शेती फायद्याची होत नाही,शेती फायद्याची होत नसल्यामुळे नवीन शेती व्यवसायात उतरण्याचे धाडस शेतकरी करीत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात दैन्य, दारिद्र्य,उपासमार,ओढाताण, कर्जबाजारीपणा, अंधश्रद्धा या व अशा गोष्टी वाढत चालल्या असून शेतकरी जीवनाची परवड होत आहे "7

अशा प्रकारची भावना व्यक्त करून शेतकऱ्यांची चहू बाजूने होणारी परवड या ठिकाणी पाहायला मिळते. 'पाढा ' या कवितासंग्रहाच्या माध्यमातून कवीने शेतकऱ्यांचे थोडे सुखवस्तू जीवन दाखवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण नंतर आलेल्या त्यांच्या चालणारे अनवाणी पाय, अथक, गाभा, टिळा,या कवितासंग्रहातून शेतकऱ्याची होणारी परवड किंवा ओढाताण चित्रित केली आहे. शेतकऱ्याचे शोषण या व्यवस्थेने कशाप्रकारे केले आहे ते दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी आता क्रांतीप्रवण व्हायला पाहिजे तरच त्यांचे अस्तित्व टिकू शकेल अशाप्रकारचा आशावादही व्यक्त केला आहे ते एका कवितेत म्हणतात,

**" मी मनगटांना शिकवतो लढयाच्या आरोहाची**
**विजय बाराखडी**
**ढोंग पांघरून काळवंडलेल्या वर्तमानाच्या**
**बेडर चेहऱ्यावर**
**मी,**
**उमटवतो सुडाचा जिव्हारी ओरखडा"8**

शेतकऱ्यांनी आपल्या लढ्यासाठी आता सज्ज व्हायला पाहिजे कारण शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्यांचा बेडर चेहऱ्यावरील पडदा फाडायला पाहिजे आणि त्यांचा सूड घेतला पाहिजे असे कवीला वाटते. कारण शेतकऱ्यांचे शोषण,नोकरदार, राजकारणी,व्यापारी यांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात केलेले आहे. त्यांच्या मनात शेतकऱ्यांच्या विषयी बेईमानीचीच बीजे रुजलेली आहे. त्यामुळे सरकार हे शेतकऱ्यांचे हित ज्या योजनात आहे त्या योजना न राबवता स्वतःचेच हित करून घेतांना दिसते. यामुळेच शेतकऱ्यांच्या मनात सरकार विषयी प्रचंड रोष असलेला आपल्याला पाहायला मिळतो. शेतकऱ्यांनी हा रोष क्रांती करून प्रकट करावा असे कवीला वाटते. या अनुषंगानेच शरद जोशी यांनी आपल्या 'अंगारमळा ' या पुस्तकातून शेतकऱ्याविषयी भावना प्रगट करताना म्हटले आहे की, " शेतकऱ्या विषयी नागरी समाजाने आपली मन बधिर करून घेतली आहेत ; मग त्या समाजातलं ते कलाक्षेत्र असो,नाट्य असो, काव्य असो, संगीत असो का साहित्य असो. नागरी समाजाच्या ग्रामीण जनतेबद्दलच्या करुणेच्या सहभावनेच्या इंद्रियाला आलेली बधिरता दूर होणे ही सगळ्यात महत्त्वाची आवश्यकता आहे. "9

शहरी समाजात राहणाऱ्या लोकांनी ग्रामीण जनतेबद्दल त्यांच्या मनात असणारी बधिरता काढायला पाहिजे आणि त्यांच्याही जीवनात आनंद फुलेल असं वर्तन करायला पाहिजे ही भावना शरद जोशी याठिकाणी बोलून दाखवतात.कारण आज शेतकरी सगळीकडूनच नागवल्या जात आहे. त्याच्या वाट्याला आलेले दुःखाचे शुक्ल काष्ठ संपवायला कुठेच जागा दिसत नाही असे कवीला वाटते. म्हणूनच ते म्हणतात,

**" सोन्यासारखा माल पिकवायचा**
**उन्हासोबत योध्यासारखे लढायचे**
**तहानभूक विसरून, डोंगर उलथून टाकायचे**
**मरणासरणाचा अनुभव जितेपणीच**
**घ्यायचा जन्मोजन्म**
**जिंदगीसोबत चिकटून असलेलं हे गोलचक्कर**
**बंद होण्यासाठी अजून पर्याय का सापडत नाही? "10**

शेतकरी हा जमिनीत राब -राब राबून त्या जमिनीतून सोन्यासारखा माल पिकवित असतो पण तरी त्याला त्या मरणयातणाच भोगाव्या लागतात. कारण त्याच्या ह्या सोन्यासारख्या मालाला सरकार किंवा व्यापारी त्याच्या मनासारखा भाव देत नाही.त्यामुळे त्याला जीवनात समाधान मिळत नाही.त्याच्या या जिंदगानीच गोलचक्र केव्हा संपेल आणि त्यालाही सुख प्राप्त होईल असा पर्याय सरकार का शोधून काढत नाही ? हा प्रश्नही कवी शासन व्यवस्थेला विचारू पाहत आहे. त्यांच्या चिंतनाचा विषय येथे नागावलेला शेतकरी,शेतकऱ्यावर अन्याय करणारी व्यापारी प्रवृत्तीची माणसे, सावकार, भांडवलदार, माणूसपण विकून खाणारे भोंदूगिरी करणारे दलाल, व्यसनाधीनतेमुळे आयुष्य उध्वस्त झालेले तरुण, गळफास घेऊन आत्महत्या करणारे शेतकरी, वैधव्य प्राप्त झालेल्या

स्त्रिया अशी वेगवेगळ्या विषयाची नोंद त्यांनी आपल्या या सहाही कवितासंग्रहातून घेतलेली आहे.

**निष्कर्ष :**

1. ग्रामीण जीवनामध्ये शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आपल्या पशु,पक्षापासून, निसर्गातून प्राणवायू मिळत असतो असे कवीला वाटते.
2. शेतकऱ्यांनी आपल्या जीवनामध्ये काही प्रथा,परंपरा, निती, नियम बनवून ठेवले होते. त्यांचे पालन ते नित्यनेमाने करीत असत.जसे खळ्यावर बोडक्या डोक्याने जाऊ नये हा नियम.
3. गाव संस्कृतीने खऱ्या अर्थाने सहकाराचे जाळे महाराष्ट्रात विणले असे कवीला वाटते.

1. 4.गाव संस्कृतीने दिलेला जीवनधर्म आजच्या काळातील शेतकरी विसरले असल्यामुळे त्यांच्या जीवनात दुःख आले आहे.
2. 5.जसे श्रमाला गावसंस्कृतीने महत्त्व दिले होते पण आजच्या काळातील तरुण हा श्रम न करता गंजिफा, दारू,इतर भानगडी यात व्यस्त झाल्यामुळे त्याच्या जीवनात दुःख आले असे कवीला वाटते.

6. भांडवलदारवर्ग, व्यापारीवर्ग, शासन यांनी सतत स्वार्थी हेतूने शेतकऱ्यांना लुबाडण्याचेच काम केले आहे.त्याच्या परिश्रमाची कदर कधीही केलेली नाही.

**संदर्भग्रंथ :**


- केशव सखाराम देशमुख,पाढा , साक्षात प्रकाशन,औरंगाबाद,2006, पृ.11
- ऊनि.पृ. 16
- केशव सखाराम देशमुख, अथक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2010, पृ.25
- मोहन पाटील,ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, ति.आ. 2013, पृ.3.
- केशव सखाराम देशमुख, चालणारे अनवाणी पाय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2008, पृ.42.
- केशव सखाराम देशमुख, टिळा, काव्यग्रह प्रकाशन,वाशिम, 2022,पृ.76.
- वामन जाधव, ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन,सुविद्या प्रकाशन, सोलापूर,2007, पृ.10
- चालणारे अनवाणी पाय पृ. 58.
- शरद जोशी,अंगारमळा, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद,2018, पृ.130.
- गाभा, पृ. 51.


Research Hub International Journal